# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३६

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक २०/०८/२०२५ दुपारी ४-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ३. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ४. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| ८. | श्री चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| ९. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १०. | श्री संजय मोरे | कार्या. अधिक्षक |
| ११. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १२. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १३. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १४. | श्री प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १६. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १८. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २०. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २१. | श्री अनिल भडागे | प्र. वाहन विभाग प्रमुख |
| २२. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २३. | श्री गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २४. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

विषय क्रमांक:-५६६ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्र. ३३, ३४, ३५ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४४ दिनांक २०/०८/२०२५**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३३ दिनांक १४/०७/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५०९ ते ५३० क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३४ दिनांक २३/०७/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३१ ते ५३४ क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३५ दिनांक ०१/०८/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३५ ते ५४३ क्रमश:वाचून कायम करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.
वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५६७ पाणीपट्टी विभागातील दुबार बिले व प्रत्यक्ष जागेवर नळ नसलेल्या पाणीपट्टी धारकांची पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपायुक्त (कर) माय नेट कडुन स्थापत्यकडे डाटा हस्तांतर करतांना पाणीपटटीची बिले दुबार जनरेट झाली होती. त्यांची एकुण मागणी ८,१२,११८/- रुपये आहे. तसेच हददवाढ भागातील गावात सरसकट संगणक प्रणालीमध्ये नळजोडण्या दाखवल्यामुळे अस्तित्वात नसलेल्या ७२ नळ जोडण्याअतिरिक्त संगणक प्रणालीमध्ये दाखविण्यात आल्या होत्या. त्यांची मागणी रक्कम ९,३०,१४०/- रुपये आहे. यासंदर्भात आपल्याला मालमत्ताधारकांच्या लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार स्थानिक फिटर, वसुली लिपीक यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अहवाल सादर केला आहे. निरीक्षक व अधिक्षक यांनी याबाबत खात्री केली आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक महोदया यांना अधिकार आहेत. त्यानुसार सदर बिले ही मनपाच्या ऑनलाईन प्रणालीतुन रदद करणेबाबत विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरची बिले निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे तसेच संबंधीतांना याबाबत कळविण्यात यावे. तसेच संबंधीतांना प्रॉपर्टी टॅक्स भरणा केल्याची खात्री करुन घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४५ दिनांक २०/०८/२०२५**

माय नेट कडून स्थापत्यकडे डाटा हस्तांतरण करताना पाणीपट्टीची बिले दुबार जनरेट झाली होती. त्यांची एकूण मागणी ८,१२,११८/- रुपये आहे.तसेच हद्दवाढ भागातील गावांमध्ये सरसकट संगणक प्रणाली मध्ये नळजोडण्या दाखवल्यामुळे अस्तित्वात नसलेल्या ७२ नळ जोडण्या अतिरिक्त संगणक प्रणालीमध्ये दाखविण्यात आल्या होत्या. त्यांची मागणी रक्कम ९,३०,१४०/- रुपये आहे. यासंदर्भात आपल्याला मालमत्ताधारकांच्या लेखी तक्रारी अर्ज प्राप्त

झालेली आहेत.त्यानुसार स्थानिक फिटर,वसुली लिपिक यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल सादर केला आहे. निरीक्षक व अधीक्षक यांनी खात्री केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत मा.आयुक्तास स्थायी समिती मान्यतेने कोणत्याही करा बद्दल किवा कोणतेही कर वसूल करण्यासाठी झालेले खर्चाबद्दल येणे असलेले जे कोणते ही रक्कम त्याच्यामध्ये वसूल होणे जोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल असे नमूद आहे.

तरी दिनांक ०१/०४/२०२५ ते २३/०७/२०२५ पासुन १ ते ५१ दुबारा बिलांची रक्कम रुपये. ८,१२,११८/- निर्लेखित करण्यास तसेच मनपा पाणीपुरवठा फिटर यांच्या अभिप्रायानुसार अस्तित्वात नसलेली १ ते ७२ रक्कम रुपये. ९,३०,१४०/- करणे बाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषता कलम १५२ नुसार मे.स्थायीसमिती सादर. सदर नमूद बिलांच्या नोंदी संगणक प्रणालीतून रद्द करणे व नमूद बिलांच्या रकमा निर्लेखित करण्यासाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व कार्यालयीन अहवालानुसार, पाणीपट्टी विभागातील दुबार बिले व प्रत्यक्ष जागेवर नळ नसलेल्या पाणीपट्टी धारकांची पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत आलेल्या दिनांक ०१/०४/२०२५ ते २३/०७/२०२५ पासुन १ ते ५१ दुबारा बिलांची रक्कम रुपये. ८,१२,११८/- निर्लेखित करण्यास तसेच मनपा पाणीपुरवठा फिटर यांच्या अभिप्रायानुसार अस्तित्वात नसलेली १ ते ७२ रक्कम रुपये. ९,३०,१४०/- निर्लेखित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ नुसार निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर पाणीपट्टी धारकांकडून मालमत्ता कर वसुल करुन पाणीपट्टी निर्लेखित करण्याबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५६८ — धुळे महानगरपालिका मालमत्ता कर व पाणीपट्टी रिक्षाद्वारे जाहिर आवाहन करणेसाठी ४ रिक्षा लावणेत असुन झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.प्र.भांडारपाल — मालमत्ता कर विभागाने थकबाकीसाठी जनजागृती करणेसाठी रिक्षा भाडयाने लावण्याचे आदेशित केले होते. आदेशानुसार दि.१७/६/२०२५ ते दि.२७/६/२०२५ एकुण ११ दिवस ४ रिक्षा लावण्यात आल्या होत्या. सदरच्या खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — ज्या लोकांनी तक्रारी केल्या होत्या. आऊटर मेजरमेंटसाठी तर किती लोकांचे मोजुन झाले.

मा. अधिक्षक — सर्वांचे मोजमाप झाले आहे. आतापर्यंत २३ हजार लोकांनी कर भरणा केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आता परत लोकांना कर भरण्यासाठी आवाहन केले पाहिजे. २३ हजार लोकांनी कर भरणा केला याचा अर्थ आपण चुकीचे काम केले नाही.जे डिफॉल्टर लोकांना टॅक्स भरण्यासाठी आवाहन करावे. आपल्या सर्व टिम बाहेर काढा. ५ ते ६ लाख रुपये सुध्दा दररोज भरणा होत नाही. मनपा कर्मचारी पगार करण्यासाठी पैसे नाही अशी परिस्थिती आहे. पाटबंधारे

विभागाचे बिल थकीत आहे. पाणीपटटीची डिमांड प्रचंड मोठी आहे.२-३ दिवसाआड लोकांना पाणीपुरवठा करतोय. परवा व्हीसी झाली सेक्रेटरी सरांसोबत इरिगेशन विभागाच्या थकीत पाणीपटटी संदर्भात.मग यासगळयांचा मेळ बसणार कसा. वसुलीसाठीसर्वांनी बाहेर पडा. जुनी पाणीपटटी थकबाकी ४५ कोटी व चालु मागणी ११ कोटी आहे. हे युनिट चालु राहण्यासाठी वसुलीसाठी बाहेर पडावे. इरिगेशनवाले पाणी देण बंद करतील. नाहीतर मनपाला जीएसटीची ग्रँट येते त्याचे पैसे रिकुप करुन टाकतील. पाणीपटटी वसुलीसाठी फोकस करा. ३-३ कोटीची बिलं आहेत. कुठुण भरणार आपण पाणीपटटी व घरपटटी संदर्भात लोकांना आवाहन करा. वसुलीसाठी मोहिम राबवा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४६ दिनांक २०/०८/२०२५**

मालमत्ता कर अधिक्षक यांनी **हिंन्दुस्थान एन्टरप्राईजेस, धुळे** यांना कार्यादश देण्यात आला होता. धुळे महानगरपालिका मालमत्ता कर व पाणीपट्टी रिक्षाद्वारे कामी शास्ती माफी ३० जुन २०२५ पावेतो वाढविण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने शहरातील नागरीकांना या शास्ती माफीचा लाभ घेणे कामी धुळे शहर व हद्दवाढ भागासाठी दि.१७ जुन २०२५ व २७ जुन २०२५ या कालावधीसाठी रिक्षा द्वारे साऊंड च्या माध्यमातुन थकीत मालमत्ता कर भरणे बाबत जाहिर आवाहन करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदरचे कामाबाबत **हिंन्दुस्थान एन्टरप्राईजेस** यांच्याकडुन सदरचे काम करण्यात आलेले आहे. सदरचे काम हे मजुरी चे असल्याने GST कर यांना लागु होत नसुन यांचे कुठलेही कर न कापता त्या अन्वये सदरच्या सेवाधारकांकडील बिलाप्रमाणे एकूण खर्च सर्व करासोबत रुपये १,०३,८४०/- सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व अहवालानुसार धुळे महानगरपालिका मालमत्ता कर व पाणीपट्टी रिक्षाद्वारे जाहिर आवाहन करणेसाठी ४ रिक्षा लावणेत झालेल्या एकूण खर्च सर्व करासोबत रुपये १,०३,८४०/- मात्रला महाराष्ट्रा महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५६९ श्रीमती योगिता घोडके रोजंदारी वर्ग- ४ कर्मचारी यांना रोजंदारी दरवाढ लागु करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४७ दिनांक २०/०८/२०२५**

श्रीमती योगिता घोडके रोजंदारी वर्ग- ४ कर्मचारी यांनी सुधारीत रोजंदारी दर लागु करण्याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सरकारी कामगार अधिकारी धुळे यांचेकडून सुधारीत वेतन दर मिळणेबाबत कळविणेत आले होते. अनुषंगाने सरकारी कामगार अधिकारी धुळे यांनी महाराष्ट्र शासनाने दि २०/२/२०२५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था (ब) ग्रामपंचायत वगळून हे किमान वेतन दर नमुद केलेले आहे.

धुळे महानगरपालिकेमध्ये वर्ग ४ चे श्रीमती योगिता घोडके हया एकच कर्मचारी विभागात कार्यरत आहेत. त्यांचा रोजंदारी दर रु. ६५४/- इतका आहे. सरकारी कामगार

अधिकारी यांच्या पत्रानुसार परीमंडळ १ मध्ये सर्व मनपांचा समावेश असून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक ०१/०१/२०२५ पासून सुधारीत रोजंदारी वेतन दर अकुशल कर्मचाऱ्यांसाठी रुपये ८५०/- मात्र होत आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावा नुसार, श्रीमती योगिता घोडके रोजंदारी वर्ग ४ कर्मचारी यांना रुपये ८५०/- मात्र रोजंदारी दरवाढ ठरावाच्या दिनांकापासून लागु करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७० श्री चेतन प्रदीप नवसारे, कनिष्ठ अभियंता यांना मानधन पदावरील नियुक्तीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक श्री. चेतन नवसारे हे पुर्वी मानधनावर कार्यरत होते. परंतु त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे आपण त्यांनासेवेतुन कमी केले होते. दरम्यानच्या काळात त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे त्यांनी पुनश्च मानधन तत्वावर नियुक्ती मिळणेकामी अर्ज सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांचा कुठे दावा वगैरे पेडींग आहे का?

मा. कार्या.अधिक्षक दावा मागे घेण्याबाबत त्यांनी पत्र दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक दावा मागे घेतल्यावरच पुढील कार्यवाही करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४८ दिनांक २०/०८/२०२५**

श्री चेतन प्रदीप नवसारे हे मागासवर्गीय भरती मोहिम अंतर्गत अनुसुचित जमाती संवर्गातुन कनिष्ठ अभियंता (मानधन) पदावर दि.०४/१०/२०२२ रोजी रुजू झाले होते, तद्नंतर ०४/१०/२०२२ ते १५/१२/२०२३ पर्यंत कार्यरत मानधनावर कार्यरत होते, अनुसुचित जमाती जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने जातप्रमाणपत्र अवैध ठरविले कारणास्तव त्यांची सेवा दि.०५/१०/२०२३ पासुन समाप्त केली होती.

ज्या अनुसुचित जमाती जातप्रमाणपत्र समितीने जातप्रमाणपत्र अवैध ठरविले होते त्याच पडताळणी समितीने न्यायालयीन आदेशाला अनुसरून Case No. १४/४९८/Ser/०८२०२३/१८३३३ Dt. १९/०७/२०२४ रोजी वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले व प्राप्त झाले आहे. त्यानुसार कनिष्ठ अभियंता मानधन तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत श्री नवसारे यांनी विनंती केलेली आहे.

श्री चेतन नवसारे यांनी मे कामगार न्यायालय धुळे येथे पीजीए क्र ०३/२०२५ अन्वये मानधन तत्वावर कनिष्ठ अभियंता या पदावर सेवेत सामावून घेणेबाबत दावा दाखल केलेला आहे. सदर दावा मे. कामगार न्यायालयातून काढून घेण्याच्या शर्तीवर श्री चेतन नवसारे यांना मानधन तत्वावर पुन:श्च कामावर घेणेबाबत विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार मे. कामगार न्यायालयातील न्यायप्रविष्ठ दावा काढून घेण्याच्या शर्तीवर श्री चेतन प्रदीप नवसारे, कनिष्ठ अभियंता यांना ठरावाच्या दिनांकापासून सहा महिने कालावधी करीता मानधन तत्वावर पुनश्च नियुक्ती करणेस वाचा

क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०५ अंतर्गत रस्ते कॉंक्रीट करणे (गुरुदत्त कॉलनी) कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या फेरसादर कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजन सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.५ मध्ये रस्ते कॉंक्रिट करणेबाबतचा विषय आहे. मा. जिल्हाधिकारी सो. यांनी रु. २९,९६,१२५/- मात्रला प्र.मा. दिली आहे. ई निविदा मागवुन ४ निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यात सर्वात कमी दराची निविदा गिरीष चिंतामण मराठे यांची होती. त्यांनी अतिरीक्त सुरक्षा अनामत उशिराने भरल्यामुळे उशिर झाला आहे. दर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४९ दिनांक २०/०८/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र 05 अंतर्गत रस्ते कॉंक्रीट करणे (गुरुदत्त कॉलनी) बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र **क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०५३/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४** यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **२९,९६,१२५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./**३८५**/२०२४-२५ **दि.२७/०९/२०२४** अन्वये रक्कम रु. **२९,९६,१२५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.गिरीष चिंतामण मराठे | शे.-६.०१ % कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्तीने | |
| ४ | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे.४.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ **मे.गिरीष चिंतामण मराठे** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **२८,१६,०५८/-** इतक्या रक्कमेचे असून **शे.-६.०१ % कमी** दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.गिरीष चिंतामण मराठे** यांचे दर **शे.-६.०१ % कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.गिरीष चिंतामण मराठे** यांची **शे.-६.०१ % कमी** दराने आलेले निविदा दरमंजूरीस्तव मे.स्थायी समिती पुढे फेरसादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०५ अंतर्गत रस्ते कॉंक्रीट करणे (गुरुदत्त कॉलनी)कामी आलेल्या श्री/**मे.गिरीष चिंतामण मराठे** यांचे दर **शे.-६.०१ % कमी** या दरास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७२ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये रामचंद्र नगर येथे दक्षिण मुखी मारोती मंदिर परिसरात पायाभुत सुविधा विकास करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या फेरसादर कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात एल-१ ने असमर्थता दर्शविली आहे. असे लोक ब्लॅक लिस्ट करावे.

मा.उपअभियंता अनामत रक्कम जमा करण्याबाबत आपण लेखा विभागास पत्र दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक रिटेंडर करण्यात यावे. सदरचा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५० दिनांक २०/०८/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र.11 मध्ये रामचंद्र नगर येथे दक्षिण मुखी मारोती मंदिर परिसरात पायाभुत सुविधा विकास करणे कामी विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले. यामध्ये श्री/ **मे.कौस्तुभ सचिन दिक्षित** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३१,९८,५६७/-** इतक्या रक्कमेचे असून **शे.-०.९९ कमी** दराने आहे.

निविदेत भाग घेतलेले पात्र ठेकेदार श्री/ **मे.कौस्तुभ सचिन दिक्षित** यांचे दर **शे.-०.९९ कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **L१-मे.कौस्तुभ सचिन दिक्षित** यांनी दि.१९/०५/२०२५ रोजी देऊन सदर काम करण्यास असमर्थ असल्याबाबत कळविले आहे. सदरचे काम **L२-मे. गिरीष प्रमोद बाविस्कर** यांनी दर वाटाघाटी अंती दि.१०/०६/२०२५ रोजी दिलेल्या पत्रात **शे १.२०%** कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

**L२-मे. गिरीष प्रमोद बाविस्कर** यांना **शे १.२०%** कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव कलम ४५२अ च्या (१अ) नुसार मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व निर्देशानुसार **L१** यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविलेली असल्याने याकामाबाबत फेर निविदा दर मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०२ ओसवाल नगर येथील उत्तरमुखी मारुती मंदिरा समोरील मुख्य डी.पी.रोड MSCB कार्यालय पासून ते मुख्य हायवे पर्यंत काँक्रीट रोड करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र. २ येथे रस्ता काँक्रिटीकरणाचा विषय आहे. मा. जिल्हाधिकारी सो. यांनी रु. ४९,९९,२६०/- खर्चाच्या रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. ई निविदा मागविण्यात येवुन त्यात अभिषेक चिंचोले यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा आली आहे. सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५१ दिनांक २०/०८/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र.02 ओसवाल नगर येथील उत्तरमुखी मारुती मंदिरा समोरील मुख्य डी.पी.रोड MSCB कार्यालय पासून ते मुख्य हायवे पर्यंत काँक्रीट रोड करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र **क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/ १०५३/ २०२४-२५ दि.०७/१०/२०२४** यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **४९,९९,२६०/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./**३८८**/२०२४-२५ **दि.२७/०९/२०२४** अन्वये रक्कम रु. **४९,९९,२६०/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अभिषेक विजय चिंचोले | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. सौरभ संजय कदमबांडे | शे. २.०० % जास्तीने | |
| ३ | मे. महालक्ष्मी इंटरप्रायसेस | शे. ३.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ **मे.अभिषेक विजय चिंचोले** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **४९,९९,२६०/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.अभिषेक विजय चिंचोले** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.अभिषेक विजय चिंचोले** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०२ ओसवाल नगर येथील उत्तरमुखी मारुती मंदिरा समोरील मुख्य डी.पी.रोड MSCB कार्यालय पासून ते मुख्य हायवे पर्यंत काँक्रीट रोड करणेकामी **मे.अभिषेक विजय चिंचोले** यांचे आलेल्या **अंदाजपत्रकीय** दरास वाचा क्र.

१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७४ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मु.ले.परीक्षक दि.१/७/२०२५ ते ३१/७/२०२५ या कालावधीचा साप्ताहिक लेखा तपासणी अहवाल मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर. यात एकच बाब निदर्शनास आणुन द्यावयाची आहे. मागील स्थायी मध्ये सुध्दा हा विषय झाला होता. अजुनही संबंधीत विभागांना दिलेल्या अर्धसमासाची उत्तरे दिली हात नाही. नगररचना विभागाकडे ७ ते ८ हाफ मार्जिन आहे. दोनही ओव्हरसियर यांना वेळोवळी प्रत्यक्ष बोलावुन कळविले. तरी प्रतिसाद दिला जात नाही. त्यातला महत्वाचा विषय असा आहे. ज्यामध्ये जवळपास २५ कोटीच्या आसपास रक्कम आहे. ज्या आपण बांधकाम परवानगीच्या वेळी वसुल करतो. त्या वसुल केल्या जातात, त्या रिडायव्हर्ट होवुन डेव्हलपमेंट अकाऊंट जो आहे तो इथेच पडुन आहे. या रकमा आपल्या अकाऊंटच्या बाहेर आहे आपल्या अकाऊंट मध्ये इफेक्ट होत नाही. यामध्ये अपहार होण्याची शक्यता आहे. अस जर झाले तर मोठा धोका आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्या लोकांना त्याचा कंन्सर्न असल्याचे कारण नाही. कदाचित त्यांना माहित पण नसेल काय करायचे त्यांना. रिडायरेक्ट होऊन किती रक्कम परत येते.

मा.मु.ले.परीक्षक जवळपास अडीच कोटीच्या आसपास रक्कम आहे. हे सर्व मागील सर्व १० ते ११ वर्षापासुन सुरु आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ते सर्व चेक करुन घ्या लेखाधिकारी साहेब तुम्ही सुध्दा चेक करा. कारण हे लोक टेक्नीकल पर्यंत आहेत. अकाऊंटच्या गोष्टी हे लोक बघणार नाहीत. त्यातील सिरिअल क्रोनोलॉजी समजुन घ्या. हे कशा पध्दतीने प्रोसेस होते. तुम्ही जे सांगत आहात कितीतरी नगरपरिषदांमध्ये आपल्याकडे जसे BPMS लागु झाले जेव्हापासुन डायरेक्टली तिकडुन डिडक्शन होतात. मी पण जिथ जिथ काम केले माझ्यादेखील बघण्यात रिफंड ची प्रोसिजर बघीतली नाही. फक्त काय आहे ते बघुन घ्या आणि समजुन पण घ्या.

मा.मु.ले.परीक्षक याच्या अगेन्स्ट १ टक्के रक्कम रिबेट म्हणुन मिळणे अपेक्षीत असते. तीदेखील घेता आलेली नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक ती जर आलेली नसेल आणि कुठ क्लेम करायचे असेल त्याची काही प्रोसीजर आहे का याबाबत तुम्ही गाईड करा म्हणजे आपण ती रक्कम क्लेम करु.

मा.मु.ले.परीक्षक या सगळया गोष्टी मी संबंधीतांना सांगीतल्याआहे. त्या पुढील स्थायी समितीसमोर ठेवणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक लेखा विभागाने व मुलेप यांनी यावर चर्चा करुन घ्या. त्या रकमा क्लेम करा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५२ दिनांक २०/०८/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०१/०७/२०२५ ते दि. ०४/०७/२०२५ पर्यत तसेच दि.०७/०७/२०२५ ते दि. ११/०७/२०२५ तसेच दि. १४/०७/२०२५ ते दि. १८/०७/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २१/०७/२०२५ ते दि. २५/०७/२०२५ तसेच दिनांक २८/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला. या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागांकडून अनुपालनाबाबत आवश्यक ती पूर्तता करावी. तसेच याबाबत लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७५ मानधनावरील वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक संबंधीत विभागप्रमुखांच्या अहवालानुसार मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासुन ५ दिवसाचा खंड धरुन एकत्रित मानधनावर पुढील ६ महिन्याकरीता महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ५३ (१) नुसार मुदतवाढ देण्याबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर केलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक एकदा ठराव झाला की, त्यांना लगेच ऑर्डर देण्यात यावी. महिना महिना फाईली त्यांच्या प्रलंबीत असतात. पगार निघण्यास अडचणी येतात.यापुढे मुदत संपण्यापुर्वी विषय स्थायी समितीपुढेसादर करावा आणि ऑर्डर वेळेत कर्मचाऱ्यांना देण्यात यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५३ दिनांक २०/०८/२०२५**

धुळे महानगरपालिकेतील प्रस्तावात नमुद कर्मचारी यांना मानधन तत्वावर ०६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देण्यात आली होती. तरी उक्त अनुक्रमांक १ ते ३८ मानधन कर्मचारी यांची नियुक्तीची मुदत संपुष्टात येत आहे.

उक्त मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार मानधनावरील अनुक्रमांक १ ते ३८ वैदयकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची

सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार फेरनियुक्ती देणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७६ धुळे मनपा हद्दीत अवधान उपनगर येथे असलेल्या दसनाम गोसावी समाजाच्या दफन भूमीस संरक्षण भिंत बांधणे व स्ट्रीट लाईट ई. कामे करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा हददीत अवधान उपनगर येथे दशनाम गोसावी समाजाची दफनभुमी आहे. तेथे संरक्षक भिंत बांधणेकामी व लाईट व्यवस्था करणेकामी निविदा मागविण्यात आली होती. तयात अंकित किशोर भंडारी यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा आली होती. दरास मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५४ दिनांक २०/०८/२०२५**

धुळे मनपा हद्दीत अवधान उपनगर येथे असलेल्या दसनाम गोसावी समाजाच्या दफन भूमीस संरक्षण भिंत बांधणे व स्ट्रीट लाईट ई. कामे करणे कामास म.आयुक्त ताठां प्रशासक सो., यांच्या दि. २७/०६/२०२५ रोजीच्या टिपणी मान्यतेने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४९,८८,७४२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ७८/२०२५-२६ दिनांक २३/०६/२०२५ अन्वये रक्कम रु. ४९,८८,७४२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | एकविरा कन्सट्रक्शन , धुळे | शे.२% जास्तीने | |
| २ | अंकित किशोर भंडारी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ३ | दिपेश सुभाषकुमार लिलवाणी | शे.३% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. अंकित किशोर भंडारी, धुळे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. अंकित किशोर भंडारी , धुळे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरी कामी मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांच्या कडेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषता: कलम ४५२ अ च्या (१ ब) नुसार मे.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उक्त कामी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे मनपा हद्दीत अवधान उपनगर येथे असलेल्या दसनाम गोसावी समाजाच्या दफन भूमीस संरक्षण भिंत बांधणे व स्ट्रीट लाईट

ई. कामे करणेकामी आलेल्या **मे. अंकित किशोर भंडारी, धुळे** यांच्या **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या दरास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५७७ महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचे दौरा दरम्यान केलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी आलेल्या कार्यालयीनअहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा. आयुक्त महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष आले होते. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय आदेशानुसार त्यांची निवास, भोजन व वाहन व इतर व्यवस्था करण्यात आली होती. त्याप्रमाणे खर्च करण्यात येवुन कार्योत्तर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५५ दिनांक २०/०८/२०२५**

मा. श्री. मुकेश सोनु सारवन, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, मुंबई यांचा दि. १३/०७/२०२५ ते १५/०७/२०२५ रोजी धुळे जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला होता.

म. निवासी जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी धुळे यांनी क्र.स्वागतकक्ष/कावि/९५/२०२५ दि. ११/०७/२०२५ अन्वये किशोर सुडके (सहा.आयुक्त मनपा धुळे) यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली त्याप्रमाणे मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचे दौरा दरम्यान रु. ३२०७६/- मात्रचा खर्च झालेला आहे. उपरोक्त विषय मान्यतेसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचे दौरा दरम्यान झालेला खर्च रुपये ३२०७६/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**